ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १०　　पुणें, बुधवार तारीख २१ जुलै, १९५४　　अंक १८

## विविध माहिती

**वृद्धापकाळासंबंधी परिषद**—लंडन येथें वृद्धापकाळ व तत्संबंधींचे प्रश्न ह्याविषयीं विचारविनिमय करणारी परिषद गेल्या १९ तारखेस भरविण्यांत आली होती. वृद्धांचें शारीरशास्त्र, त्यांना होणारे रोग, त्यांना देण्यास योग्य असें शिक्षण व नोकरी, इत्यादि प्रश्नांचा विचार परिषदेंत करण्यांत आला. निरनिराळया ५० देशांचे प्रतिनिधी परिषदेस हजर राहिले होते.

**जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें**—चालू वर्षाच्या दुसऱ्या तिमाहींत इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हेलपमेंट ह्या संस्थेनें पाकिस्तान, सीलोन, नॉर्वे, पेरू आणि फ्रेंच वेस्ट आफ्रिका ह्या पांच देशांना मिळून ६,७३,१०,००० डॉलर्सचीं कर्जें दिलीं. १९४६ पासून जागतिक बँकेनें १०५ कर्जें दिलीं. त्या सर्वांची मिळून बेरीज १,९३,३५,५८,४६४ डॉलर्स झाली.

**भारतीय सरकारकडे कर्जाची मागणी**—मध्यप्रदेशांतील पहिल्या पंचवार्षिक योजनेंत वीज-उत्पादन करण्याच्या ज्या योजना आखण्यांत आल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी राज्य-सरकारनें भारतीय सरकारकडे १ कोटी रुपये कर्जाची मागणी केली आहे. राज्यांतील वाढत्या विस्ताराच्या शहरांना अधिक वीज पुरविण्याचेंहि राज्य सरकारनें ठरविलें आहे.

**दिवा-दासगांव रेल्वे रस्ता**—रत्नागिरी जिल्ह्यांतील दिवा व दासगांव हीं गांवें मुंबईला जोडणाऱ्या रेल्वे-रस्त्याची पहाणी लवकरच विमानांच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत दळणवळणाचीं साधनें फार अपुरीं आहेत. शेतीचा हंगाम संपल्यावर जिल्ह्यांतील पुष्कळ लोक रोजगारीसाठी मुंबईला जात असतात.

**दिल्लीला विजेचा पुरवठा**—नुकत्याच पुऱ्या करण्यांत आलेल्या गंगुवाल ह्या वीज-केंद्रांतून पुढील वर्षीच्या प्रारंभीं दिल्लीला विजेचा पुरवठा होऊं लागेल असें समजतें. ह्या धरणावर दोन जनरेटर्स बसविण्यांत आले आहेत. त्यापैकीं प्रत्येकावर २४,००० किलोवॅट वीज तयार होऊं शकेल. तिसरा जनरेटर वर्ष अखेर बसविण्यांत येणार आहे. विजेच्या तारांना आधार देणारे पोलादी मनोरे १०२ फूट उंचीचे असतील.

**इंग्लिश-शेर्पा शब्दकोष**—इंग्लिश-शेर्पा-तिबेटी भाषेचा पहिलाच शब्दकोष अमेरिकेंत लवकरच प्रकाशित करण्यांत येणार आहे. प्रकाशन कॅलिफोर्निआ विद्यापीठातर्फे करण्यांत येणार असून सर एडमंड हिलरी हे शब्दकोषाला प्रस्तावना लिहिणार आहेत. विषयानुक्रमाप्रमाणें लावण्यांत आलेल्या १,००० महत्त्वाच्या इंग्लश शब्दांचे शेर्पा भाषेंतील आणि तिबेटी भाषेंतील पर्याय शब्दकोषांत देण्यांत यावयाचे आहेत.

**आंध्रांत सोडा ॲशचा कारखाना**—आंध्र राज्यांत सोडा ॲशचा कारखाना काढणें शक्य असल्यानें खाजगी भांडवलदारांना त्यासाठी आवाहन करण्यांत यावें, असें राज्य-सरकारचें मत आहे. धंद्याची उभारणी करण्यासाठी योग्य तें साह्य देण्याची तयारीहि सरकार दाखवीत आहे.

**रशिआंतील पुस्तकांचें उत्पादन**—१९१३ सालीं रशिआंत जितकीं पुस्तकें छापलीं जात असत त्याच्यापेक्षा १० पट अधिक पुस्तकें हल्लीं छापलीं जातात. सोव्हिएट सरकार अधिकारावर आल्यापासून आतांपर्यंत ११,५३,००० पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं. रशिआ बाहेरील परदेशी ग्रंथकारांची २,४५,००,००० पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं.

**कुर्नूल जवळ नवा विमानतळ**—कुर्नूल नजीक कुर्नूल-बेल्लारी रस्त्यावर लहानसा विमानतळ बांधण्यांत येणार असल्याचें समजतें. विमानतळासाठी २०० एकर जागा खरेदी करण्याची खटपट आंध्र सरकार करीत आहे. विमानतळ बांधण्यासाठी सुमारें १५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**जंगलवाढीसाठी मदत मंजूर**—उत्तर प्रदेश सरकारनें आपल्या राज्यांतील चार डोंगराळ जिल्ह्यांत जंगलांची वाढ करण्याचें ठरविलें असून त्यासाठी २५,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. विंध्य पर्वतांत असलेल्या बुंदेलखंड वगैरे भागासाठीहि अशीच मदत देण्यांत येणार आहे.

**तुर्कस्थानांतील शतायुषी**—तुर्कस्थानांत १०० अगर अधिक वर्षें वय असणारे १,५१६ पुरुष आणि २,७३४ स्त्रिया आहेत असें समजतें. रशिया-तुर्कस्थानच्या सरहद्दीवर पूर्व तुर्कस्थानांतील डोंगराळ भागांतच त्यांची वसती मुख्यतः आढळून आली आहे.

**बुद्ध-गया देवळाची दुरुस्ती**—बुद्ध-गया देवळाच्या व्यवस्था-समितीची बैठक नुकतीच भरली होती. मुख्य देवळाच्या भागाची दुरुस्ती करण्यासाठीं व आसपासच्या भागाचा विकास करण्यासाठी भारतीय सरकारच्या पुराणवस्तु-संशोधन खात्याच्या एखाद्या तज्ज्ञाची मदत घेण्याचें समितीनें ठरविलें आहे. देवळांत वीज खेळविण्यासाठी सीलोनमधील महाबोधी सोसायटीनें दिलेल्या ५ हजार रुपयांचा उपयोग करण्याचेंहि ठरलें. हें देऊळ १,७०० वर्षांचें जुनें आहे.

**पोस्टासाठी नवी इमारत**—मद्रास सर्कलच्या पोस्ट-मास्टर जनरलच्या कचेरीसाठी नवी इमारत पुढील वर्षाच्या अखेर बांधण्यांत येणार आहे. इमारतीसाठी सुमारें १४ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. इमारत तीन मजली होईल. मद्रासमधील सध्यांच्या पोस्टाच्या इमारतीजवळ असलेल्या मोकळ्या जमिनीवर ती बांधण्यांत येणार आहे.

### ठेवीदाराला ग्रामोफोनची तबकडी बक्षीस

अमेरिकेंतील बँका कित्येक नाविन्यपूर्ण व महाग पद्धतींचा अवलंब करून ठेवी आकर्षित असतात. एका वेळीं २५ डॉलरची ठेव ठेवणाराला, दि क्लीव्हलँड सोसायटी फॉर सेव्हिंग्ज एक ग्रामोफोनची तबकडी बक्षीस देते. किमान १० डॉलर ठेवून खातें उघडणाऱ्या २,००,००० ठेवीदारांना प्रत्येकी १ डॉलर बक्षीस देण्याची योजना एका बँकेनें आखली आहे. सेव्हिंग्ज बँका व व्यापारी बँका ह्यांच्यांत ठेवींसाठी चढाओढ चालू आहे.

### नवभारताचीं तीर्थस्थळें

"आपल्या भारतांत कितीतरी तीर्थस्थळें आहेत. परंतु आतां नव्या भारताचीं तीर्थस्थळें ठिकठिकाणीं निर्माण होऊं लागलीं आहेत. भाक्रा–नानगल, दामोदर व्हॅली, तुंगभद्रा, विशाखापट्टम, सिंद्री, बंगलोर, इत्यादि ठिकाणच्या भव्य योजनांस लोकांनीं भेट द्यावी व नवभारताच्या निर्मितीचें स्वरूप ध्यानांत आणावें, अशी माझी सूचना आहे.":—पंडित नेहरूंचें एक ताजें भाषण.

### पुस्तकांचें प्रदर्शन

महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या विद्यमानें संग्रहालयाच्या शास्त्रीय व औद्योगिक ग्रंथालयाकडे येणाऱ्या विविध अर्वाचीन व महत्त्वपूर्ण अशा वाङ्मयाचें व इतर साहित्याचें सार्वजनिक प्रदर्शन कॉमनवेल्थ इमारतींत दिनांक १ ऑगष्ट १९५४ पासून उघडण्यांत येणार आहे. प्रदर्शन दोन महिने मुक्तद्वार खुलें राहील. प्रदर्शनाची वेळ दुपारीं ३ ते ५ अशीं ठेवण्यांत आली आहे.

प्रदर्शन उघडण्याचा समारंभ श्री. शं. द. उरसळ, बी. ए., महापौर, पुणें महानगरपालिका यांच्या हस्तें दिनांक १–८–१९५४ रविवारीं सकाळीं १० वाजतां होणार आहे.

### चर्चिल–ईडनच्या प्रवासाचा खर्च

मि. चर्चिल व मि. ईडन ह्यांनीं प्रेसिडेंट आयसेनहोवरशीं चर्चा करण्यासाठी वॉशिंग्टनला प्रवास केला, त्याला १ लक्ष, ३० हजार रु. खर्च आला.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २

॥ तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व ॥ —श्रीमद्भगवद्गीता

## १९५३

४,३९,१३४ रुपये – १९५२ चा तोटा भरून काढला

५,८०,४२० रुपये – घसारा काढला

७,७३,१५६ रुपये – ठेवीदार, बँका इत्यादींचें व्याज दिलें

**प्रेफरन्स शेअर ५ टक्के, ऑर्डिनरी शेअर ३ टक्के नफा**

तोटा भरून काढावयाचा नसता तर
ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के नफा देतां आला असता

★

सिंडिकेटला १० टक्के नफ्याचा आत्मविश्वास म्हणून ठेवींचें भांडवल स्वीकारलें

**ठेवींच्या मुदती वाढवून मिळत आहेत**

**★ नवीन ठेवी येत आहेत ★**

### ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत पांच वर्षे — व्याज ७॥ (साडेसात) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.


ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. १४–७–१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. २१ जुलै, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पैशाच्या पुरवठ्यांतील अनुरूप वाढ

### रिझर्व्ह बँकेचा १९५३–५४ चा आढावा

१९५३–५४ मधील बँकिंग व नाणेविषयक आकडे पाहिले, तर त्यापूर्वीच्या एक-दोन वर्षांत जनतेला उपलब्ध असलेल्या चलनांत होत राहिलेल्या घटीस आळा बसून, त्या चलनाचा पुरवठा वाढूं लागला असल्याचें दिसून येतें. शेड्यूल्ड बँकांकडील एकूण ठेवींत १६ कोटींची वाढ झाली; १९५१–५२ मध्यें त्यांत घट झालेली होती व १९५२-५३ मध्यें फारच थोडी वाढ अनुभवास आलेली होती. डिमांड देण्यांत थोडी घट होऊनहि एकूण ठेवी वाढल्या, ह्याचा अर्थ मुदती ठेवींत मुख्यतः वाढ झाली. परराष्ट्रीय व्यापाराला बँकांची मदत कमी प्रमाणांत लागली, परंतु अंतर्गत व्यापाराची कर्जाची गरज वाढली. अन्नधान्याचा व्यापार खुला झाला त्याचा तो परिणाम होय. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचा आंकडा १९५२--५३ मध्यें एकदम खालीं आला होता, त्यामानानें १९५३-५४ मध्यें फारसा बदल झाला नाहीं. बँका स्वतःच्या पैशांतून व रिझर्व्ह बँकेच्या मदतींतून, कर्जाची मागणी समाधानकारक पुरवूं शकल्या. ७ मे, १९५४ रोजीं शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम ५७६ कोटी रु. भरली, त्यापूर्वीच्या वर्षी त्याच काळीं ती ५५४ कोटी रु. होती. ७ मे, १९५२ चा कर्जाचा आंकडा (६०० कोटी रु.) आतांपर्यंतच्या कोणत्याहि दिवशींच्या मानानें मोठा होता. १९५३-५४ मधील बँकिंग क्षेत्रांतील महत्त्वाच्या घटना खालीलप्रमाणें झाल्या. (१) श्रॉफ कमिटीची नेमणूक, (२) बँकिंग कंपनी कायद्यांत दुरुस्ती, (३) रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती, व (४) सौराष्ट्र सरकारचे बँकर म्हणून रिझर्व्ह बँकेची नेमणूक आणि हैद्राबाद व म्हैसूर राज्यांत अनुक्रमें हैद्राबाद स्टेट बँक व बँक ऑफ म्हैसूर ह्यांची रिझर्व्ह बँकेचे एजंट म्हणून नेमणूक.

जनतेजवळील पैशाचा पुरवठा १९५१–५२ मध्यें १७३ कोटी रु. नीं कमी झाला होता व १९५२–५३ मध्यें ४१ कोटी रु. नीं आणखी उतरला होता. पण, १९५३–५४ मध्यें तो ९४ कोटी रु. नीं सुधारला. ह्या ९४ कोटी रु. च्या वाढीपैकी निम्मी वाढ रिझर्व्ह बँकेंत सरकारी ठेवींची वाढ झाली, त्याचा परिणाम होय. सोबतच्या तक्त्यांत १९५०–५१ पासून १९५३–५४ अखेरच्या मुदतींत नाण्याच्या पुरवठ्याची परिस्थिति स्पष्ट करून दाखविली आहे.

जनतेजवळील पैशाच्या पुरवठ्यावर खालील गोष्टींचा मुख्यतः परिणाम होतोः—

(१) परराष्ट्रीय देण्या--घेण्याची परिस्थिति—त्यांत निघणारी घट वा वाढावा. (२) सरकारची अंदाजपत्रकाची परिस्थिति. (३) ओपन मार्केट ऑपरेशन्स, इत्यादींच्या द्वारा रिझर्व्ह बँक बिगर--बँकिंग क्षेत्रांत करीत असलेली चलनाची वाढ किंवा घट. (४) बँका करीत असलेली क्रेडिटची वाढ किंवा घट. १९५१--५४ ह्या तीन वर्षांच्या मुदतींत पैशाचा एकूण उपलब्ध पुरवठा कमी झाला, ह्याचें प्रबळ कारण म्हणजे आपल्या परराष्ट्रीय देण्या--घेण्यांतील तूट हें होय. टाइम देणीं वाढलीं आणि रिझर्व्ह बँकेजवळील रुपी सिक्युरिटीज कमी झाली, हीं पैसा-पुरवठ्याच्या परिस्थितीवर परिणाम करणारीं दुसरीं महत्त्वाचीं कारणें होतीं. अंदाजपत्रकांतील तुटींमुळें, वरील कारणांच्या चलन-संकोच घडवून आणण्याच्या परिणामास थोडा आळा बसला.

१९५३–५४ ह्या वर्षापुरतें पाहिलें, तर वरील पैकीं पहिलीं दोन कारणें पैशाचा पुरवठा वाढण्यास पोषक होतीं. पूर्वीच्या वर्षी परराष्ट्रीय देणें–घेणें रमा–रमीचे झालें व मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांत तूट आली. भारताच्या आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांतील वाढत्या उलाढाली लक्षांत घेतल्या म्हणजे गेल्या वर्षांतील पैशाच्या पुरवठ्यांतील वाढ सयुक्तिकच वाटेल. पिकें चांगलीं आलीं, औद्योगिक उत्पादनांत प्रगति झाली, किंमती चढीच्या राहिल्या आणि अन्नधान्याचा बाजार बऱ्याच अंशीं

( कोटी रु. चे आंकडे )

| | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२--५३ | १९५३-५४ | १९५१--५४ |
|---|---|---|---|---|---|
| १ जनतेजवळील चलन | + ८३·६ | – १००·८ | – १५·८ | + ५२·८ | – ७३·८ |
| २ शेड्यूल्ड बँका व माहिती पुरविणाऱ्या बिगर–शेड्यूल्ड व सहकारी बँका ह्यांचेकडील डिमांड ठेवी | + २७·८ | – ५४·३ | – १७·३ | + ०·२ | – ७१·४ |
| ३ रिझर्व्ह बँकेकडील सरकारी ठेवी | – १९·२ | – १·३ | – ५·२ | + ४२·७ | + ३६·२ |
| ४ रिझर्व्ह बँकेकडील इतर ठेवी | + ८·७ | – ६·४ | – ३·१ | – १·८ | – ११·३ |
| **५ जनतेजवळील पैशाचा पुरवठा (१ + २ + ३ + ४)** | + १००·९ | – १७२८ | – ४१·४ | + ९३·८ | – १२०·३ |
| **६ सरकारी ठेवी वगळून, जनतेजवळील पैशाचा पुरवठा (१ + २ + ४)** | + १२०·१ | - १७१·५ | – ३६·२ | + ५१·२ | – १५६·५ |

सुरू झाल्या, त्यामुळें पैशाची गरजहि वाढली होती. मोसमी पैशाच्या वाढीची तुलना केली, तर १९५२-५३ मध्यें ती ८३ कोटी रु. जास्ती होती; १९५३-५४ मध्यें त्या वाढीचा आकडा १८२ कोटी रुपयांवर गेला. पूर्वीच्या वर्षांतील मोसमी वाढीच्या मानानें ही वाढ मोठी वाटते, परंतु १९५०-५१ मधील वाढ युद्धोत्तर कालांतील सर्वांत मोठी म्हणजे २१६ कोटी रुपयांची जास्त होती. १९५३-५४ मधील मोसमी वाढीच्या कारणांत मोसमांतील पैशाची वाढती गरज हें एक कारण होतेंच, पण त्याबरोबरच पंचवार्षिक योजनेखालील सरकारी खर्चास त्याच सुमारास वेग आला व परराष्ट्रीय देण्याघेण्यांतहि वाढावा दिसला, याहि गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

## अणुशक्तीच्या साह्यानें विजेची निर्मिति

गेल्या मार्च महिन्यांत अमेरिकेनें पॅसिफिक महासागरांत हैड्रोजन बॉबचा स्फोट केला. अणु-विज्ञानाच्या इतिहासांत ती एक महत्त्वाची घटना होऊन गेली. आतां रशिआनें अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्याचा पहिला कारखाना चालू केल्याची घोषणा केली आहे. रशिआनें अणुसंशोधनावर फार मोठा खर्च चालविला असल्याच्या वार्ता कांहीं महिन्यांपूर्वी आल्या होत्या. अणुशक्तीचा उपयोग औद्योगिक कार्यासाठी करण्याच्या कामीं रशिआनें बरीच प्रगति केल्याच्याहि वावड्या उठल्या होत्या. रशिअन अणुविज्ञानाविषयीं लिहितांना पॉल बोल्ह ह्या अमेरिकन शास्त्रज्ञानें असे विचार व्यक्त केले होते कीं, शिसें आणि चांदी ह्यांचें सोन्यांत रूपांतर करण्यासाठीं रशिअन शास्त्रज्ञ अणुविज्ञानाचा उपयोग करण्याच्या मार्गावर आहेत. हें खरें असलें, तर त्यांना किमया साध्य होईल असें दिसतें आणि पाश्चात्य जगाला तो सर्वांत मोठा आश्चर्याचा धक्का वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तथापि, रशिआ युरेनिअमच्या विघटनेचा-संघटनेचा उपयोग करून वीज निर्माण करूं शकेल ह्याहि घटनेला पाश्चात्य राष्ट्रें फारशीं तयार होतीं असें दिसत नाहीं. सर्वसामान्य समज असा होता कीं, अणुविज्ञानाचा उपयोग औद्योगिक कार्यासाठी करण्याच्या बाबतींत ब्रिटन अमेरिकेपेक्षाहि १० वर्षें पुढें होतें. ब्रिटनमधील पहिलें अणुशक्तीचें वीजकेंद्र १९५६ मध्यें सुरू होणार आहे असें समजतें. म्हणजे ह्या बाबतींत रशिआनें आश्चर्यकारक आघाडी मारली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अमेरिकेंतील अणुविज्ञान मुख्यतः संहारक अस्त्रांचा शोध लावण्याच्या कामीं लावण्यांत आल्यामुळें रशिआला ही आघाडी मारतां आली असावी असा अंदाज करण्यांत येत आहे. तें कसेंहि असलें तरी ह्यापुढें जगांत कोळसा, गॅस आणि जलविद्युत् ह्यांची जागा अणु-निर्मित वीज घेणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत. अणुशक्ति-निर्मित विजेपासून फायदा काय असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. अणुशक्तीपासून निर्माण झालेली वीज अधिक स्वस्त मिळेल आणि अगदीं थोड्या युरेनिअमपासून खूप मोठी उष्णता निर्माण करतां येईल असें म्हणतात. ३०,००,०० गॅलन पेट्रोलपासून जितकी उष्णता निर्माण होईल तितकी उष्णता एक पौंड युरेनिअम निर्माण करूं शकेल असा हिशेब करण्यांत आला आहे. तथापि अणुशक्तीचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे उद्योगधंद्यांच्या विकेंद्रीकरणाची वाढलेली शक्यता होय. अमेरिका अणुशक्ति निर्माण करणारीं, जागोजाग हलवितां येणारीं, यंत्रें तयार करण्याच्या योजना आखीत आहे. ह्या शक्ति केंद्रापासून वाटेल तेवढी औद्योगिक शक्ति निर्माण करतां येईल. भारतासारख्या मागासलेल्या देशाला तर अणुशक्तीच्या वीजकेंद्रांचा फार उपयोग होण्यासारखा आहे. कारण, कोळसा अगर तेल नसलेल्या भागांत सुद्धां अणुशक्ति केंद्रें उभीं करून उद्योगधंदे काढणें त्यांच्यामुळें शक्य कोटींत येणार आहे.

## कालव्याचे प्रदेशांतील उसाचे ६ एकरांचे ब्लॉक

महाराष्ट्रांतील कालव्याच्या प्रदेशांत ऊंस लावणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या बाबतींत ब्लॉक क्षेत्राची कमाल मर्यादा ठरवून देण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे.

उसाचे ब्लॉक सहा वर्षांच्या मुदतीनें मंजूर करण्याची पद्धत महाराष्ट्रांतील कालव्याखालील भागांत गेलीं तीस वर्षें चालू आहे. ब्लॉकची मुदत संपल्यावर त्यांची रिव्हिजन करण्यांत येते आणि त्यावेळीं सरकार सर्व ब्लॉक रद्द करून नवे ब्लॉक मंजूर करते. म्हणजे ब्लॉकवर कोणाचाहि कायमचा हक्क नाहीं. परंतु असे नवे ब्लॉक मंजूर करतांना पूर्वी ब्लॉक धारण करणाऱ्या लोकांच्या मागणीचा योग्य तो विचार करण्यांत येतो. ब्लॉक वांटपासंबंधीच्या आपल्या धोरणांत बदल करण्याच्या दृष्टीनें सरकार बरेच दिवस विचार करीत असून ऊंस लावणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या बाबतींत ब्लॉक क्षेत्राची कमाल मर्यादा ठरवून देण्याचा सरकारचा विचार आहे. अडविलेल्या पाण्याच्या सांठ्यापैकीं ६६ टक्के पाणी उसाच्या पिकासाठीं वापरण्यांत येत असून आतां उसाची लागवड करण्यासाठीं नवीन शेतकऱ्यांना किंवा सध्यां असलेल्या उसाच्या क्षेत्राची वाढ करण्यासाठीं पाण्याचा जरूर तो सांठा उपलब्ध नाहीं. उसाच्या पिकापासून चांगला फायदा होत असल्यामुळें ब्लॉकबाबतची मागणी बरीच वाढलेली आहे. परंतु पाणीपुरवठा मर्यादित असल्यामुळें शेतकऱ्याकडे जास्तींत जास्त केवढा ब्लॉक असावा याबाबत कमाल मर्यादा ठरवून देण्याच्या प्रश्नाचा सरकारला विचार करणें आवश्यक वाटतें. याप्रमाणें ब्लॉकसाठीं १८ एकरांची कमाल मर्यादा ठरवून देण्याचा विचार आहे. (त्यांतील सहा एकर क्षेत्र उंसाखालीं असेल.)

ही कमाल मर्यादा घालतांना सर्व भागांतील संबंधीं लोकांना शक्यतोंवर एकसारखेपणानें वागविलें जावें असें सरकारला वाटतें. म्हणून ही कमाल मर्यादा सर्व कालव्यांच्या प्रदेशांत १९५६ च्या फेब्रुवारींत अंमलांत आणावी असा सरकारचा बेत आहे. नीरा कालव्याच्या प्रदेशांतील ब्लॉकची रिव्हिजन १९५५ च्या फेब्रुवारींत येते आणि इतर कालव्यांच्या प्रदेशांत ती १९५८ च्या फेब्रुवारींत येईल. तेव्हां नीरा कालव्याच्या प्रदेशांत ब्लॉक धारण करणाऱ्या सध्यांच्या लोकांची मुदत १९५६ पर्यंत पुढें चालू ठेवण्यांत येईल. सर्व कालव्यांचें प्रदेशांत १९५६ सालीं ब्लॉकची नवी पद्धत अंमलांत आणतांना प्रत्येक विभागांत, चालू ब्लॉक रिव्हिजन सुरू झाल्याच्या तारखेपासून ज्यांच्याकडे ब्लॉक असतील असेच लोक, जुने ब्लॉकहोल्डर समजण्यांत येतील.

सहकारी साखर कारखान्याच्या वाढीस उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें वरील ब्लॉकची कमाल मर्यादा तेथें लागू करण्यांत येणार नाहीं. तथापि सहकारी कारखान्यांचे ऊंस पिकविणारे जे सभासद असतील त्यांना साखर कारखान्याच्या उपयोगासाठीं लागणाऱ्या उसाच्या क्षेत्राखेरीज अधिक क्षेत्र दिलें जाणार नाहीं.

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड

### प्रेफरन्स भागांवर ५% ऑर्डिनरी भागांवर ३% डिव्हिडंड

ता. ३०-९-१९५३ अखेर संपलेल्या वर्षांत घसारा, मॅनेजिंग एजंट यांचें कमिशन आणि जिनिंग फॅक्टरीचे विक्रींतील तोटा व शेतीकडील जनावरांचा मृत्यु यामुळें आलेला तोटा यांखेरीज सर्व खर्चवेंच वजा जातां रु. ११,७३,४८२-१-४ पै नफा झाला आहे. घसारा, मॅनेजिंग एजंट यांचें कमिशन व वर नमूद केलेल्या दोन बाबींमुळें आलेला तोटा हें सर्व वजा जातां ताळेबंदास नेलेला निव्वळ नफा रु. ५,३४,५८२-१-४ आहे. त्याचा विनियोग पुढीलप्रमाणें करण्याचें संचालकांनीं सुचविलें आहेः—

(१) सन १९५१-५२ सालच्या ताळेबंदांत दाखविलेली तोट्याची सर्व रक्कम लिहून टाकण्यासाठीं. रु. ४,३९,१३३-१३-५

(२) (अ) ३०-९-५३ अखेर प्रेफरन्स भागांवर ५ टक्केप्रमाणें नफा वांटणी रु. १२,५००

(ब) १९५१-५२ सालासाठीं प्रेफरन्स भांडवलावरील देणें राहिलेलें नफा रु. १२,५०० रु. २५,०००-०-०

(क) ता. ३०-९-५३ अखेर ऑर्डिनरी भागांवर दरशेंकडा ३ टक्के नफा रु. ७०,०००-०-०

पुढील वर्षासाठीं शिल्लक ... रु. ४४८-३-११

रु. ५,३४,५८२-१-४

अहवालाचे सालीं कंपनीचे उसाचें दर एकरीं प्रमाण ४६ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा शेंकडा ११·१ टक्के मिळाला व त्यामुळें सन १९५१-५२ सालीं झालेला रु. ४,३९,१३३-१३-५ चा तोटा भरून काढतां आला.

ता. ३०-९-१९५२ अखेरच्या ताळेबंदांत कायम ठेवींची असलेली रक्कम रु. ९६,२१,३०० वरून अहवालाचे वर्षअखेरीस रु.७३,३५,४०१ इतकी कमी झाली व ह्या अहवालाचे तारखेस ती रु. ५९,००,००० इतकी कमी झाली आहे. याप्रमाणें कायम ठवींचीं देणीं रु.३६,२१,३०० नें कमी झाली आहेत. त्याचप्रमाणें कॅश-क्रेडिटचीं देणीं, ५ लक्ष रुपयांचें कर्ज जमेस घेऊनही, रु. १८,६५,४१५ वरून रु. ९,०९,७२३ इतकींच राहिलीं आहेत. ठवीदारांच्या, ठेवी परत करण्याबद्दलच्या, वाढत्या मागण्या पुऱ्या कराव्या लागल्यामुळें सरकारी व इतर देणीं बावयाचीं मागें ठेवावीं लागलीं आहेत. सरकारनें सदर देणीं देण्यास कृपया सवड दिली आहे. मुंबई सरकारनें डिस्टिलरी चालू करण्याचा परवाना दिला आहे. येत्या हंगामापासून स्पिरिट तयार होऊं लागून डिस्टिलरीवरील दहा लक्ष रुपयांच्या झालेल्या खर्चाचा बोजा कमी करण्यासाठीं उत्पन्नाचें नवीन साधन उपलब्ध होईल. गेल्या वर्षीचा रु. ४,३९,१३३ १३-५ चा मोठा तोटा भरून काढून झालेला फायदा हें मॅनेजिंग एजंट यांच्या विशेष परिश्रमाचें द्योतक असून त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभार मानीत आहे.


ता. ३० सप्टेंबर १९५३ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्र २९५७ एकर २० गुंठे आहे. त्यापैकीं सुमारें १८९५ एकर ऊंस १९५३-५४ चे हंगामांत गळितासाठीं घेण्यांत येईल. सुमारें ५० एकर ऊंस नवीन लागणीसाठीं बेणें म्हणून वापरला जाईल व उरलेला १००० एकर आडसालीं व ८२ एकर ३४ गुंठे आडसालीं खोडवा, १९५४-५५ चे हंगामासाठीं राहील.

एकूण ताळेबंद १,६७,४७,३७२ रु. चा आहे. मागील वर्षी तो १,९६,६२,१०९ रु. चा होता.

### भारतामधील सिगारेटच्या कंपन्या

सध्यां लंडन आणि न्यूयॉर्कमधील शेअर-बाजारांत तंबाखू कंपन्यांच्या शेअर्सना वाईट दिवस आले आहेत. सिगारेट ओढण्याच्या संवयीनें फुफ्फुसाचा कॅन्सर होतो अशा प्रकारचे विचार वैद्यकीय तज्ज्ञांनीं व्यक्त केले असल्यामुळें हा परिणाम घडून आला आहे. भारतामधील सिगारेट कंपन्या मात्र तेजीचे दिवस पुन्हां पाहूं लागल्या आहेत. आज भारतांत तंबाखू निर्यात करणाइतकी शिल्लक आहे आणि निर्यातीला वावहि चांगला आहे. भारतामधील सिगारेटच्या कंपन्यांपैकीं दोन कंपन्यांच्या भागांकडे पैसे गुंतविणाऱ्याचें सध्यां लक्ष आहे. गॉडफ्रे फिलिप्स कंपनीचा १० रुपयांचा भाग कलकत्त्याच्या शेअर-बाजारांत बराच लोकप्रिय झाला आहे. १९४६ सालीं ही कंपनी सार्वजनिक भांडवलाची झाली. तिचें भांडवल ७०,००,००० रुपये आहे आणि कारखाना मुंबईत आहे. ह्या कंपनीच्या दहा रुपये भागाच्या शेअरची किंमत रुपये २६ च्या आसपास आहे. दुसरी कंपनी म्हणजे नॅशनल टोबॅको ह्या कंपनीच्या १० रुपयांच्या ऑर्डिनरी शेअरला युद्धोत्तर तेजींत चांगला भाव आला होता. एक वेळ त्याची किंमत् ११० रुपयांपर्यंत चढली होती. ह्या कंपनीचें वसूल भांडवल १,४५,००,००० रुपये आहे. मद्रासच्या शेअर बाजारांत म्हैसूर टोबॅको कंपनीचे शेअर्सहि विकले-खरीदले जातात. ही कंपनी तंबाखूची लागवड करणारी असल्यामुळें वरील दोन कंपन्याप्रमाणें तिचें भवितव्य अतिशय उत्तेजक नाहीं. भारतामधील सिगारेटच्या कंपन्यांना अजून ब्रिटिश अगर अमेरिकन सिगारेटच्या कंपन्यांना लाभलेलें स्थान प्राप्त झालेलें नाहीं हें खरें आहे. तथापि भारतामधील पैसे गुंतविणाऱ्या वर्गाला सिगारेट कंपन्यांचें भवितव्य उज्ज्वल आहे ह्याची जाणीव आतां झालेली आहे.

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक  स्थापना : १९३५

—संचालक मंडळ—

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे — श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी — श्री. फ. दो. पद्मजी
श्री. मा. वी. शहा — श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

★ **बँकेचे सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् आतां अगदीं थोडे शिल्लक आहेत. तरी ते लवकर राखून ठेवण्याची गरजूंनीं दक्षता घ्यावी. तसेंच सेफ कस्टडीसाठीं लहानमोठ्या सीलबंद ट्रंका अगर पेट्या सुरक्षित ठेवण्याची उत्तम सोय.**

मुख्य कचेरीः— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

**चिं. वि. जोग,** मॅनेजर.

## मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखाने कोणत्याहि योग्य ठिकाणीं काढण्यास परवानगी मिळेल

मुंबई राज्यांत कोणत्याहि भागांत साखर कारखाने सुरू करण्यासाठीं सहकारी संस्था स्थापन करण्यास आडकाठी नाहीं. सरकारनें नुकत्याच काढलेल्या प्रसिद्धि-पत्रकांत ज्या भागांचा उल्लेख करण्यांत आला होता तो केवळ उदाहरणादाखल होता. कोणत्या ठिकाणीं साखर कारखाने काढले असतां त्यांना त्या भागांतून उसाचा पुरवठा होऊं शकेल या दृष्टीनें चौकशी करून सरकारनें हे भाग निश्चित केले. तथापि इतर भाग यांतून वगळण्याचा किंवा फक्त याच भागांत साखर कारखाने काढण्याचा हेतु नाहीं. ऊंस लागवडीच्या दृष्टीनें इतर कांहीं सोयीस्कर असे प्रदेश असतील तर तेथें साखर कारखाने काढण्यासाठीं सहकारी संस्था स्थापन करण्यास आडकाठी नाहीं.

साखर कारखान्यासाठीं ८,००० ते १०,००० एकर बागायती जमीन लागते. साखर कारखाना किफायतशीर रीत्या चालवावयाचा म्हणजे तो ८०० टन किंवा त्याहून अधिक ऊंस गाळणारा असला पाहिजे आणि अशा कारखान्यासाठीं एका वेळीं २,५०० ते ३,००० एकर जमीन उसाच्या लागवडीखालीं असावी लागते आणि सामान्यत: तीन वर्षांतून एकदां लागवड केली जाते.

ज्यांना आपण पुरेसा ऊंस पिकवूं शकूं आणि आवश्यक तें शेअर भांडवल उभारूं शकूं असें वाटत असेल त्यांना साखर कारखान्यासाठीं अर्ज करण्यास प्रतिबंध नाहीं. ज्या प्रदेशांचा प्रसिद्धिपत्रकांत उल्लेख केलेला नाहीं. अशा प्रदेशांच्या बाबतींत वरील पोषक बाबी समाधानकारक आहेत किंवा कसें आणि उसासाठीं वापरावयाची जमीन त्यास योग्य आहे किंवा कसें हें पाहण्याच्या दृष्टीनें त्यांची चौकशी करण्यांत येईल.

---

## जपानमधील बेकारीचा विस्तार

जपानमध्यें बेकारीनें उग्र स्वरूप धारण केलें आहे. जपानच्या मुख्य प्रधानांच्या खात्यातर्फे बेकारीसंबंधींचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. बेकार लोकांची संख्या ४०,००,००० पर्यंत पोंचल्याचें अहवालांत कबूल करण्यांत आलें आहे. प्रत्यक्ष नोंदलेल्या बेकारांची संख्या मात्र १३,२०,००० इतकीच आहे. ४० लाख बेकारांचा आकडा सुद्धां अगदीं कमींत कमी अंदाज धरून देण्यांत आला आहे. रोजगारीसंबंधीं माहिती मिळविण्याचें काम १९५३ च्या मार्च महिन्यांत सुरू झालें आणि मेमध्यें संपविण्यांत आलें. सर्वच उद्योगधंद्यांत बेकारी माजली असली तरी कोळशाच्या खाणी, बोटी बांधण्याचे कारखाने, व्यापारी वहातुक करणाऱ्या बोटींच्या कंपन्या, ह्यांमधून बेकारी फारच जास्त तीव्रतेनें जाणवत असल्याचें दिसून आलें. जपानमधील बहुतेक कामगार आपली नोकरी सुटल्यावर औद्योगिक शहरें सोडून आपल्या खेड्यांतील नातेवाईकांकडे रहाण्यास जातात आणि नोकरीधंदा मिळूं लागल्यावर शहरांत परत येतात. सरकारी पहाणीवरून असें दिसून आलें कीं, ३,६१,९०,२०० कामगारांपैकीं २७,९०,००० कामगारांना पहिली नोकरी सोडून दुसरी धरण्याची इच्छा होती. कारण, पहिल्या नोकरींत त्यांना अशाश्वति वाटत होती अगर पैसे कमी मिळत होते. सुमारें १२,३०,००० कामगार अधिक पैसे मिळविण्यासाठीं फावल्या वेळची नोकरी शोधींत होते असें दिसून आलें. जपानमधील बेकारी अधिकच वाढत जाणार अशीं चिन्हें दिसत आहेत. गेल्या वर्षी दरमहा सुमारें ३०० कंपन्यांनीं आपलें दिवाळें काढलेलें दिसून येतें. चालू वर्षाच्या मार्च महिन्यांतहि ४३३ कंपन्यांनीं दिवाळें काढलें.


# कण आणि क्षण

## ( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

★

पृष्ठसंख्या १६८ } दुसरी आवृत्ति { किं. २॥ रु. ट. ख. ४ आ.

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

★

" या पुस्तकाचें वाचन करून त्यांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहारचतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीं. "

—चिंतामण विनायक जोशी

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी ! !

# दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुरअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई } शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*रॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७२,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अमेरिकन अर्थकारणांत सहकारी संस्थांचें स्थान
## ( २ )
### ग्रामीण भागांतील सहकार

अमेरिकन शेतकऱ्याला कार्यक्षम सहकारी मंडळांची मदत मिळत असल्यामुळें त्याला कमींत कमी वेळांत व कमींत कमी श्रम घेऊन अनेक एकर जमिनीची मशागत करतां येते आणि योजनाबद्ध संघटनेच्या बळावर अधिक कामें अंगावर घेतां येतात.

अमेरिकेंतील ९७ टक्के शेतें कौटुंबिक मालकीचीं आहेत. अशा सर्व शेतांच्या सोयींसाठी सहकारी मंडळें असतात. कांहीं मंडळांत फक्त १० ते १२ शेतकरी किंवा शेतकरी कुटुंबें असतात, तर कांहींचे सभासद हजारोंनीं मोजण्याइतके असतात.

सध्यां अमेरिकेंत ६०,००० पेक्षा अधिक शेतीचीं सहकारी मंडळें असून त्यांची सभासद-संख्या सुमारें २ कोटी आहे. उलट १९३९ सालीं शेतीच्या सहकारी मंडळांत ३५ लाखांपेक्षा कमी व्यक्तींचा व कुटुंबांचा अंतर्भाव होत होता.

कांहीं अगदीं छोटीं सहकारी मंडळें मळणीचें काम करीत असतात. पिकांच्या कापणीचीं व मळणीचीं यंत्रसामुग्री सहकार्यानें विकत घेऊन चालविण्यासाठी शेतकऱ्यांनीं हीं मंडळें स्थापन केलेलीं असतात. दूधवाडीच्या उत्पादनाची विक्री करणें, जनावरें बाजारांत नेण्यासाठी वाहनांची व्यवस्था करणें, वगैरे कामासाठींहि लहान लहान सहकारी मंडळें स्थापन झालेलीं असतात.

याउलट प्रचंड कामांची जबाबदारी अंगावर घेणारीं मोठमोठीं सहकारी मंडळेंहि अमेरिकेंत आढळतात. अशा मंडळांच्या मालकीचे प्रचंड कारखाने असतात, त्यांत पुष्कळ कामगार काम करीत असतात आणि त्या मंडळांचा व्यवहार देशभर पसरलेला असतो. "फार्मर्स युनियन" आणि "नॅशनल ग्रेंज" या अशा प्रकारच्या प्रचंड देशव्यापी शेती सहकारी संघटना आहेत.

"फार्मर्स युनियन" ही सहकारी संघटना १९०२ सालीं स्थापन झाली. तेव्हांपासून ती मोठ्या शेतकऱ्यांच्या हितासाठी झटत आहे. "फॉर्मर्स एज्युकेशनल अँड को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ अमेरिका" (अमेरिकेंतील शेतकऱ्यांचा शैक्षणिक व सहकारी संघ) अस त्या संघटनेचें पूर्ण नांव आहे. जीं कामें एकएकट्यानें करतां येण्यासारखी नसतात तीं सहकार्यानें पार पाडण्यासाठी श्रमिक शेतकरी कुटुंबांनीं ती संघटना स्थापन केली आहे.

### इतर देशांना मदत

शेतकऱ्यांना शेतीच्या उत्पादनाची न्याय्य किंमत मिळावी म्हणून "फार्मर्स युनियन" ह्या सहकारी संस्थेनें इतर कोणत्याहि संस्थेपेक्षा अधिक श्रम घेतले आहेत. त्यासाठी "युनियन"नें सहकारी विक्रीच्या संघटनांचा पुरस्कार केला आहे. त्या संघटनांमार्फत शेतकरी आपल्या शेतांतील पिकें एकत्र जमवितात आणि सहकार्यानें विकतात. बहुधा प्रत्यक्ष गिऱ्हाइकांशींच या संघटना व्यवहार करीत असल्यामुळें मध्यस्थाला द्यावी लागणारी दलाली वांचते.

"नॅशनल ग्रेंज" ही अमेरिकेंतील जुन्यांत जुनी राष्ट्रीय शेती-संघटना असून, अमेरिकन शेतकऱ्याच्या प्रवक्त्याचें काम ती करीत असते. शेतकऱ्यांचा दृष्टीकोन व त्यांच्या गरजा यांना वाचा फोडून शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे पास करून घेण्यासाठी ती संघटना आपलें वजन खर्च करते.

ज्या राज्यांत "नॅशनल ग्रेंज"चे पुष्कळ सभासद असतील तेथें ती संस्था अन्योन्य सहकारी विमाकंपन्यांचा पुरस्कार करते. त्या कंपन्या विमेदार शेतकऱ्यांच्या मालकीच्या असतात. कंपन्यांचा कारभार चालविण्यासाठीं विमेदार व्यवस्थापकांची निवड करतात आणि जो नफा होईल तो आपआपसांत वांटून घेतात. अशा कंपन्या आग, वादळ व हिमवृष्टि यांपासून शेतकऱ्यांचें संरक्षण करतात.

"फार्मर्स युनियन" प्रमाणें "नॅशनल ग्रेंज" ही संघटना देशींल सहकारी विक्रीच्या व्यवस्थेचा पुरस्कार करते. त्याचप्रमाणें शेतीसाठी लागणाऱ्या वस्तू सभासदांना कमी किंमतींत मिळाव्यात म्हणून "ग्रेंज" कडून सहकारी व्यवस्था केली जाते.

### सरकारी मदत

सध्यां अमेरिकेंतील शेतीच्या उत्पादनाचा अंदाजें एक-चतुर्थांश भाग निरनिराळया सहकारी पद्धतींनें विकला जात असतो. अशा मालांत कापूस, तंबाखू, जनावरें, धान्य व दुभत्याचे पदार्थ अशा उत्पादनाचा समावेश होतो.

पुष्कळदां हीं शेती-सहकारी-मंडळें शैक्षणिक कार्यहि करतात. बाजाराचा रागरंग, शेतीच्या नवीन पद्धती, जनावरें व पिकें यांच्या रोगावर उपाययोजना आणि शेताचें उत्पादन व जनावरें यांच्या व्यवस्थेच्या योजना, या बाबतींत मंडळांकडून शेतकऱ्यांना माहिती पुरविली जाते.

राष्ट्रसंवर्धनाच्या दृष्टीनें शेतकऱ्यांचें महत्त्व लक्षांत घेऊन सरकार सहकारी मंडळांच्या स्थापनेस उत्तेजन देतें. सरकारच्या शेतीसाहाय्यक विभागांकडून अशा मंडळांच्या प्रत्यक्ष उभारणीस मदत केली जाते.

शेती सहकारी मंडळाच्या कारभारावर सभासदांचें लोकशाही नियंत्रण असावें, भांडवलावर मर्यादित व्याज दिलें जावें, नफा घेतल्याशिवाय कारभार चालविला जावा आणि निव्वळ खर्च वजा जातां जो नफा उरेल तो शेतकरी-सभासदांना त्यांनीं मंडळाशीं केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणांत वांटून दिला जावा, अशी सरकारची अपेक्षा असते. जीं मंडळें या मूलभूत अपेक्षा पूर्ण करतात त्यांना प्राप्ति-कर द्यावा लागत नाहीं.

१९१६ सालीं स्थापन झालेली "को-ऑपरेटिव्ह लीग ऑफ अमेरिका" ही सध्यां सहकारी मंडळांची महत्त्वाची राष्ट्रीय संघटना समजली जाते. इतर राष्ट्रव्यापी सहकारी संस्थांत "अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ कोऑपरेशन" आणि "नॅशनल कौन्सिल ऑफ फार्मर्स को-ऑपरेटिव्हज्" यांची गणना होते.

### फार्मर्स युनियन आणि नॅशनल ग्रेंज

"को-ऑपरेटिव्ह लीग" चा "फ्रीडम फंड" नांवाचा निधि १९५२ सालीं सुरू झाला. भारत, युरोप व अतिपूर्व येथील सहकारी संघटनांना ५,००० डॉलरपेक्षा अधिक किंमतीचे सहकारी चळवळीवरील वाङ्मय व चित्रपट पुरविण्याचें कार्य त्या निधींतून केलें गेलें आहे.

अगदीं अलीकडे नवी दिल्ली येथील इंडियन कोऑपरेटिव्ह युनियनला एक जीप व एक ट्रेलर देण्यांत आले आहेत. गेल्या वर्षी "अमेरिकन इंटरनॅशनल असोसिएशन" च्या सहकार्यानें "लीग" नें "इंडियन को-ऑपरेटिव्ह युनियन" च्या मदतीसाठीं थॉमस बी. कीहन नांवाच्या एका सल्लागाराला पाठविण्याची व्यवस्था केली होती.

"लीग" नें पुरस्कारिलेल्या "केअर" संस्थेनें (को-ऑपरेटिव्ह फॉर अमेरिकन रेमिटन्सेस टु एव्हरीव्हेअर) गेल्या नऊ वर्षांत गरजू प्रदेशांना अन्न, पुस्तकें, कपडे व शेतीचीं आऊतें अशा वस्तूंच्या १२,५०,००,००० डॉलरपेक्षा अधिक किंमतीच्या देणग्या दिल्या आहेत. "केअर" संस्थेनें जगभर सहकारी मंडळांविषयीं सद्भावना निर्माण केली आहे. (समाप्त)

## श्रॉफ कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी

## रिझर्व्ह बँकेची बिलमार्केट योजना

### कर्जांची किमान मर्यादा उतरविली

बँकांना मोसमी कर्जमागणी तत्परतेनें पुरवितां यावी ह्यासाठीं त्यांना रिझर्व्ह बँकेकडून कर्जें मिळण्याची बिलमार्केट योजना जानेवारी, १९५२ मध्यें सुरू करण्यांत आली. १० कोटी रुपयां-पेक्षा ज्यास्त ठेवी असणाऱ्या बँकांनाच ह्या व्यवस्थेचा फायदा मिळूं लागला. ९० दिवसांच्या मुदतीच्या हुंड्यांचे तारणावर रिझर्व्ह बँकेनें बँकांना कर्ज यावें, ह्या हुंड्यांवर दोन लायक सह्या असा-व्यात, त्यांपैकीं एक रीडिस्कौंटिंगच्या योजनेंतील शेड्यूल्ड बँकेची असावी, व्याजाचा दर बँकरेटच्यापक्षां ½ टक्का कमी असावा, प्रत्येक कर्जाची किमान रकम २५ लक्ष रु. असावी, प्रत्येक हुंडी किमान १ लक्ष रु. ची असावी, अशा प्रकारच्या त्या योजनेच्या अटी होत्या. बँकांच्या तक्रारी विचारांत घेऊन व पहिल्या वर्षाच्या अनुभवा-नंतर बिलमार्केट योजनेचा फायदा ५ कोटी रु. च्या ठेवी अस-णारांनाहि जून, १९५३ पासून उपलब्ध करून देण्यांत आला.

### लायसेन्सवाल्या कोणत्याहि शेड्यूल्ड बँकेस आतां रीडिस्कौंटची सोय

श्रॉफ कमिटीनें ह्या बिल मार्केट योजनेचा विचार करून असें सुचविलें, कीं त्या योजनेचा फायदा १ कोटी रुपयांवरील सर्व शेड्यूल्ड बँकांना मिळावा, प्रत्येक हुंडीची किमान मर्यादा ५० हजार रु. करावी व एका वेळीं घ्यावयाच्या कर्जाची किमान मर्यादा १० लक्ष रु. वर उतरवावी. श्रॉफ कमिटीच्या ह्या शिफा-रशी लक्षांत घेऊन, रिझर्व्ह बँकेनें आपल्या बिल मार्केट योजनेच्या अटी ढिल्या केल्या आहेत आणि श्रॉफ कमिटीच्या सूचनांचेहि पुढें जाऊन, ह्या योजनेचा फायदा सर्व शेड्यूल्ड बँकांना मिळण्याची व्यवस्था केली आहे; १ कोटी रुपये ठेवींची अट काढून टाकली आहे. श्रॉफ कमिटीच्या शिफारसींत बँका लायसेन्स घेतलेल्या असल्या पाहिजेत, हें गृहीतच होतें; लायसेन्सवाल्या बँकांनाच योजनेंत सामील करावें असा कमिटीचा उद्देश होता. तिच्या शिफारसींत मात्र तो प्रकट झालेला नव्हता. बँकिंग कंप-न्यांच्या कायद्याखालील २२ व्या कलमाप्रमाणें लायसेन्स मिळालेल्या कोणत्याहि शेड्यूल्ड बँकेला आपल्या जवळील हुंड्या रिझर्व्ह बँकेकडून रीडिस्कौंट करून मिळतील. प्रत्येक हुंडी किमान ५० हजारांची पाहिजे व एका वेळीं किमान १० लक्ष रु. च्या हुंड्या सादर केल्या पाहिजेत. हीं बंधनें मात्र त्यांनीं पाळलीं पाहिजेत.

### योजनेचा फायदा दर्शविणारे आकडे

जानेवारी–जून १९५३ मध्यें बिलमार्केट योजनेखालीं बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून ६०·८ कोटी रुपयांचीं कर्जें घेतलीं. १९५२ च्या तत्सम मुदतींतील कर्जाची रकम ७४·० कोटी रुपये होती आणि १९५४ च्या मार्च अखेरच्या पहिल्या तिमाहींत त्यांची रकम ४२·५७ कोटी रु. झाली होती. एका वेळीं ह्या योजनेखालीं बँकांकडून येणें असलेली सर्वांत मोठी एकूण रकम १९५२ मध्यें २९·६ कोटी रु. व १९५३ मध्यें २०·३ कोटी रु. होती. १९५४ च्या मार्च अखेरचा तत्सम आकडा २०·२० कोटी रु. असा आहे.

### परदेशी बिस्किटांस बंदी करण्याची मागणी

फेडरेशन ऑफ बिस्किट मॅन्युफॅक्चरर्स ऑफ इंडियाच्या कमिटीची सभा मुंबई येथें ५ जुलै रोजीं भरली होती. बिस्कि-टांच्या आयातीचा कोटा वाढविण्याच्या सरकारी निर्णयाबद्दल कमिटीनें नापसंति व्यक्त केली. हिंदी बिस्किटांचा दर्जा विदेशी बिस्किटांइतका चांगला असतांना, त्यांची किंमत माफक असतांना व हिंदी कारखान्यांची उत्पादनक्षमता अद्याप शिल्लक असतांना, परदेशी बिस्किटांची वाढती आयात समर्थनीय नाहीं, असें कमि-टीच्या ठरावानें स्पष्टपणें म्हटलें आहे. त्याच दिवशीं सायंकाळीं ताजमहाल हॉटेलमध्यें ब्रिटॅनिया बिस्किट कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर मि. पार्सन्स ह्यांच्या सन्मानार्थ एक समारंभ घडवून आणण्यांत आला मि. पार्सन्स हे आपली जागा सोडून ग्रेट ब्रिटनला परत जात आहेत. समारंभाचे वेळीं कांहीं भाषणें झालीं, त्यांत श्री. ग. रा. साठे ह्यांचेंहि भाषण झालें.

---

### 'इन्कम–टॅक्स फॉर दी लेमन' च्या आवृत्तीचें प्रकाशन

मध्यवर्ती महसूल मंडळानें 'इन्कम–टॅक्स फॉर दी लेमन' या पुस्तिकेची दुसरी आवृत्ति प्रकाशित केली आहे. त्यांत भारतांतील प्राप्तीकर कायदा आणि कारभार यांचीं मूलभूत वैशिष्ट्यें सोप्या भाषेंत विशद केलेलीं आहेत. वर्ण्यविषयाची अद्यावत् माहिती आणि सूचि यांच्या जोडीस सदर आवृत्तींत भारतीय प्राप्तीकर-कायद्यांतील आणखी कांहीं तरतुदी समाविष्ट केलेल्या आहेत. प्राप्तीकर कमिशनरांचीं अधिकारक्षेत्रें आणि प्राप्तीकर खात्याच्या कचेऱ्यांचीं ठिकाणें दाखविणारा नकाशा आणि दर्जा व प्राप्ती-नुसार कर आकारण्यांत येणाऱ्या व्यक्तींची आंकडेवारी दाख-विणारे तक्ते हीं या आवृत्तींचीं आणखी वैशिष्ट्यें आहेत.

---

### सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेसाठीं अर्ज–मुदतींत वाढ झाली

सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेसाठीं अर्ज मागविले होते, ते पोंचण्याची तारीख १५ जुलै ही ठरविलेली होती. परंतु, आतां त्यानंतरहि अर्ज स्वीकारले जातील. शक्य तितक्या लवकर अर्ज पाठवावे, कारण पुरेसे अर्ज मंजूर झाल्यानंतरच्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं.

---

### दि बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५४ च्या पहिल्या सहामाहींत ३६,८१,३५० रु. नफा झाला. पहिल्या सहामाहीसाठीं १२% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड देण्यासाठीं १५,००,००० रु. लागतील. बँकेचें वसूल भांडवल २½ कोटी रु. आहे.

---

**ग्रीसमध्यें पुन्हा स्लॉट मशीन्स**—गेल्या महायुद्धानंतर ग्रीसमध्यें प्रथमच नाणें टाकून खटका दाबण्याचीं यंत्रें पुन्हां दिसूं लागणार आहेत. युद्धानंतर ग्रीसमध्यें इतका चलनविस्तार झाला होता कीं, एखाद्या बुटाचा जोड घेण्यासहि लॉरीभरून नाणीं यावीं लागत असत. त्यामुळें अशा यंत्रांचा उपयोग करणें शक्यच नव्हतें. आतां पूर्वीच्या १,००० ड्रॅमकऐवजीं एक ड्रॅमकचें नाणें व्यवहारांत पुरूं लागलें आहे

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.